# १२. अबूखाँची बकरी

**डॉ. झाकीर हुसेन** (१८९७-१९६९ ): भारताचे तिसरे राष्ट्रपती व ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ. अर्थशास्त्र या विषयात पीएच.डी. स्फटिकांचा व चित्रविचित्र खड्यांचा संग्रह करणे, हा त्यांचा आवडता छंद होता. ते ग्रंथप्रेमी होते. जर्मन भाषेमध्ये त्यांनी महात्मा गांधी यांचे चरित्र लिहिले असून 'द डायनॅमिक युनिव्हर्सिटी' या नावाने त्यांची व्याख्याने प्रसिद्ध आहेत.

स्वातंत्र्याचे मोल प्राणापेक्षाही मोठे असते, हे बकरीच्या कथेतून सांगत स्वातंत्र्याचे महत्त्व प्रस्तुत पाठातून लेखकाने व्यक्त केले आहे.

हिमालयाच्या पायथ्याशी वसलेले 'अलमोरा' हे लहानसे खेडेगाव. तिथे अबूखाँ नावाचा एक म्हातारा गृहस्थ राहत होता. तो एकटाच असल्यामुळे नेहमीच एक-दोन बकऱ्या पाळायचा. त्यांच्यावर जीवापलीकडे प्रेम करायचा. बकऱ्या म्हणजे त्याचा जीव की प्राण ! बकऱ्या जणू त्याची अपत्ये ! तो त्यांचा पिता !

अबूखाँने आपल्या बकऱ्यांना कल्लू, मंगलिया, गोणारी, हुकुमा अशी गमतीची नावे दिली होती. त्यांच्यात अबूखाँचा सारा दिवस जाई. तो त्यांना खाऊपिऊ घाली, त्यांच्याशी बोले, त्यांना गोष्टी सांगे. त्यांच्यासोबत दऱ्याखोऱ्यांतून, रानावनांतून, शेतांतून हिंडे-फिरे. संध्याकाळ होऊ लागली, की तो सर्व बकऱ्यांना घरी आणी. सोप्यात बांधी. खाऊपिऊ घाली. रात्रीच्या वेळी कुठे बाहेर जाऊ नयेत, म्हणून डोळ्यांत तेल घालून तो त्यांना जपत असे. त्या डोंगरात एक क्रूर लांडगा वावरत होता. बकरी दिसली रे दिसली, की तो झडप घाली, मारून टाकी व खाऊन फस्त करी, म्हणून अबूखाँ आपल्या लाडक्या बकऱ्यांना खूप जपायचा.

अबूखाँने कितीही चांगले खाऊपिऊ घातले, जीव लावला, काळजी घेतली, तरी बकऱ्या मात्र संधी मिळेल, तेव्हा डोंगरावर चरायला जात. अबूखाँची उत्तम बडदास्त किंवा लांडग्यांचे भय त्यांना डोंगरात चरायला जाण्यापासून कधीही परावृत्त करू शकले नाही. दरीत गेल्यावर त्या परत येण्याचा प्रयत्न करत नसत. डोंगरदऱ्यांतून मनसोक्त हिंडायचे, मनमुराद चरायचे, मोकळेपणाने हुंदडायचे, खेळायचे, बागडायचे. हे स्वातंत्र्य अन् मोकळेपणा, जन्मजात असलेली साहसी वृत्ती यांमुळेच त्यांना अबूखाँच्या बंदिस्त आणि शांत घरापेक्षा दऱ्याखोऱ्यांतील धोक्याचे जीवन अधिक आवडत असे, यात नवल काय?

अबूखाँला मात्र याचे नवल वाटायचे. दुःख सलायचे. त्याला बकऱ्यांच्या वागण्याचे कोडे उलगडायचे नाही. 'मी एवढे हिरवेहिरवे, लुसलुशीत गवत देतो, शेतातले धान्य देतो, घरी दाणापाणी करतो, एवढे करूनही माझ्याजवळ त्या राहत नाहीत, डोंगरात जातात. लांडग्याची शिकार होतात. जीव गमावून बसतात.' अबूखाँ मनातल्या मनात हळहळायचा. त्याचे डोळे ओलेचिंब व्हायचे.

शेवटी त्याने ठरवले, की यापुढे बकरी पाळायचीच नाही. काही दिवस असेच गेले; परंतु त्याला बकरीवाचून करमेना, अन्नही जाईना. अखेर त्याचा निश्चय ढळला आणि एक दिवस त्याने एक छोटीशी बकरी आणली. ती फार सुंदर होती. बर्फासारखी पांढरीशुभ्र, अंगावर मऊमऊ केस, टोकदार शिंगे, लालचुटूक डोळे, अबूखाँचा तिच्यावर जीव जडला. तिचे त्याने आवडीने नाव ठेवले 'चांदणी'. आकाश उजळून काढणारी पांढरीशुभ्र चांदणी असते, तसे अबूखाँचे आयुष्य उजळून प्रसन्न करणारी ही बकरी 'चांदणी'.


अबूखाँने विचार केला, हिला खूप खाऊपिऊ घालू, खूपखूप जीव लावू. डोंगरात जायचा विचारही हिच्या मनात यायला नको. त्यामुळे अबूखाँ तिला नेहमी सोबतच ठेवू लागला. तिचा दोरही लांब लांब ठेवला. तिला मोकळेपणाने हिंडता येईल. मनसोक्त चरता येईल. घर तुरुंग वाटणार नाही. धोका नको म्हणून

घराभोवती चांगले मजबूत बांबूचे कुंपणही घालून घेतले. चांदणीही तिथे रमली. अबूखाँलाही आपले प्रयत्न सफल झाल्याचे समाधान मिळाले. त्याला वाटले चांदणी आता आपल्याला कधी सोडून जाणार नाही. ती इथे रमली.

एकदा चांदणीने समोर बघितले. वा ! पर्वताची शिखरे किती सुंदर ! तिथे जाऊन उड्या मारण्यात, नाचण्यात काय गंमत असेल ! छे, छे, आपण काय या बंधनात पडलो ! चार भिंतींचा तुरुंग, दोराचे बंधन, केवढे हे दुर्दैव ! आपल्याला डोंगरच हवा. मुक्त हवा हवी. मनसोक्त हुंदडायला हवे. तोच जिवाचा आनंद.

झाले, तिचे वागणेच बदलले. अबूखाँचे गवत आवडेनासे झाले. त्याच्या हातच्या पाण्यातला गोडवा हरवला. त्याच्या गोष्टींत मन रमेना. ती सारखी त्या डोंगराकडे बघत बसे. तिचे दुःख अबूखाँला जाणवले. तो तिची अधिकाधिक काळजी घेऊ लागला. बडदास्त ठेवू लागला. अबूखाँने लांडग्याचे भय दाखवले, तेव्हा चांदणीने आपली दोन शिंगे दाखवली. जणू ती सांगत होती, की शिंगांनी त्याचा मुकाबला करीन. लढत देईन. हा तिचा निर्धार अबूखाँने ओळखला. त्याने तिला लांडग्याचा धाक दाखवला. त्याने मारलेल्या बकऱ्यांच्या कथा ऐकवल्या. ती सुरक्षित राहावी, म्हणून तिला खोलीत कोंडून कुलूप घातले. हे करताना खिडकीकडे त्याचे लक्ष राहिले नाही. चांदणी त्याच खिडकीतून उडी घेऊन आपले सारे बळ एकवटून पळाली.

डोंगर जणू दोन्ही हात पसरून तिचे स्वागत करत होता. मोकळा थंडगार वारा तिला कुरवाळत होता. इथे चार भिंती नाहीत, कुंपण नाही, दोराचे बंधन नाही, नजरेचा पहारा नाही, सारे कसे मुक्त. मोकळे.



आनंदी. मनाला हवेसे वाटत असते तसे ! चांदणी त्या वातावरणात हरवून गेली. नाचली, खेळली, हुंदडली, गायली. दुपार झाली. मेंढ्या-बकऱ्यांचे कळप आले, गेले. मेंढपाळाने हाकलत नेले. चांदणीला असा कुठलाच कळप वा बंधन आता नको होते. हा मोकळेपणाच तिला लाखमोलाचा होता.

हळूहळू अंधार पडू लागला. दरीतून अबूखाँची तिला बोलवणारी शीळ आली. चांदणीने तो मोह टाळला. रात्र झाली. झुडपातून गुर्रगुर्र आवाज पुन्हा पुन्हा आला. दोन खुनशी डोळे चकाकू लागले. चांदणीला लांडग्याचे स्मरण झाले. त्याच्याशी प्राणपणाने झुंज देत आपला जीव गमावणाऱ्या बकऱ्यांच्या कथा आठवल्या. 'आपण भेकड नाही. शूर आहोत. आपल्यातही बळ आहे. शिंगे आहेत. झुंज द्यायला हवी. जयपराजय काय होईल ते होवो, सर्वस्व पणाला लावू.' असे तिने ठरवले.

लांडगा झडप घालायला आला. चांदणी सामोरी गेली. तिचा त्वेष व धैर्य पाहता ती वाघीणच दिसू लागली. दोघांची लढत लागली. ती खूप वेळ चालली. रात्र सरत होती. चांदणी सूर्योदयाची वाट पाहू लागली. शेवटी कोंबडा आरवला. चांदणी रक्तबंबाळ होऊन पडली. झाडावरील पक्षी हे सारे पाहत होते. त्यांच्यात चर्चा सुरू झाली. कोण जिंकले? बहुतेकांना लांडगा जिंकला असे वाटले. एक शहाणा पक्षी म्हणाला, ''नाही. ही झुंज चांदणीने जिंकली.''

◆◆◆

## स्वाध्याय

**प्र. १. खालील चौकटी पूर्ण करा.**

(अ) अबूखाँचे गाव

(आ) अबूखाँचे बकऱ्या बांधण्याचे ठिकाण

(इ) अबूखाँ बकरीला खाऊ घालत त्या गवताची वैशिष्ट्ये

(ई) अबूखाँच्या नवीन बकरीचे नाव

**प्र. २. खालील आकृती पूर्ण करा.**

(अ) **छोट्या बकरीसाठी अबूखाँने केलेल्या सोई**

(आ) **चांदणीचा स्वातंत्र्याचा आनंद**

**प्र. ३. कारणे लिहा.**

(अ) अबूखाँच्या गोष्टीत चांदणीचे मन रमेना, कारण......

(आ) चांदणीने अबूखाँला दोन शिंगे दाखवली, कारण........

(इ) चांदणी खिडकीतून उडी घेऊन पळाली, कारण...

**प्र. ४. उत्तरे लिहा.**

(अ) बकऱ्या म्हणजे जणू त्यांची

(आ) डोंगराने चांदणीचे केलेले स्वागत

(इ) तिचा त्वेष व धैर्य पाहता ती भासली

**प्र. ५. स्वमत.**

चांदणी आणि लांडगा यांच्यातील लढतीचे तुमच्या शब्दांत वर्णन करा.

GDMVD1